# रचनावादी शिक्षण म्हणजे काय ?

**रचनावादी शिक्षण म्हणजे काय ?**

- रचनावादी शिक्षण म्हणजे असे शिक्षण की ज्यात,

• मुले - मुली स्वतःचे स्वतःच शिकतात.

• स्वतःच्या प्रेरणेने व आपल्या आवडी-निवडींनी शिकतात.

• अनेक प्रकारचे अनुभव घेऊन शिकतात.

• सतत काहीतरी करत करतच शिकतात.

• मुले - मुली एकमेकांची मदत घेत घेत शिकतात.

ही पाच सूत्रे लक्षात ठेवून, यांनुसार घरी आणि शाळेमध्ये मुला-मुलींच्या शिक्षणाची सर्व व्यवस्था करायची आहे.

**रचनावादी शिक्षण : सूत्र - १**

- मुला - मुलींना स्वतःहून शिकण्याची संधी मिळावी. कारण,

• शिकणे म्हणजे आजूबाजूच्या जगाची ओळख करून घेणे.

• मनुष्य स्वतःचे स्वतःच शिकत असतो.

• ही निसर्गाने दिलेली देणगी असते.

• मेंदू हा माणसाचा शिकण्याचा अवयव असतो.

• जग समजावून घेण्याचे त्याचे काम सततच चालते. म्हणून,

• आपणहून शिकणे हे नैसर्गिक असते.

• दुसऱ्याने शिकविणे नैसर्गिक नसते.

• आपल्या मुला - मुलींना स्वतःहून शिकण्यास प्रवृत्त करा; संधी द्या.

**रचनावादी शिक्षण : सूत्र – २**

- शिकण्याची उपजत प्रेरणा टिकवून, मुला-मुलींना आवडीचे काम करण्याची, स्वतः निवड करण्याची संधी मिळणे.

• लहान वयात मेंदू वेगाने शिकत असतो.

• मुला - मुलींना सतत शिकायला आवडते.

• जे आवडते ते अधिक व नीटपणे शिकले जाते.

• खूप संधी समोर ठेवल्या तर मुले स्वतः निवड करतात.

• निवड करणे मुलांना आनंददायक वाटते.

• आनंदाने शिकते व शिक्षण वेगाने होते.

**रचनावादी शिक्षण : सूत्र - ३**

- मुला - मुलींना वयोमानानुसार विविध प्रकारचे अनुभव मिळत राहणे.

कारण,

• बालपण हे मेंदूवाढीचे सर्वोत्तम वय असते.

• शिकणाऱ्या मेंदूला भरभक्कम खाद्यही लागते.

• विविध प्रकारचे अनेक अनुभव हे मेंदूचे खाद्य असते.

• शारीरिक हालचालींचे ,बडबडण्याचे , हसण्याचे , सतत काहीतरी करण्याचे अनुभव मेंदूला हवे असतात.

• अनुभवांनीच मेंदू तल्लख होतो.

•म्हणून मुला - मुलींना वेगवेगळे , खूप अनुभव मिळतील असे पाहा; त्यासाठी नियोजन करीत रहा.

**रचनावादी शिक्षण : सूत्र - ४ - करून शिकणे ही शिकण्याची अत्युत्तम पध्दत असते.**

कारण,

• सतत 'ऐकून' शिकायला लावले तर मेंदू थकतो.

• एकाच प्रकारे शिकत राहिल्याने मेंदूच्या विकासात एकारलेपणा येतो.

• मेंदू हा सतत शोध घेत असतो, त्यामुळे मुले सतत काहीतरी करीत राहण्यात गुंगतात,रमतात.

• क्रियाहीन बसणे मुलांना आवडत नाही.

• स्वस्थ बसून राहण्याने मेंदूच्या विकासात अडथळा येत असतो.म्हणून,मुला - मुलींना, प्रत्यक्ष हातांनी काही ना काही करण्याची संधी द्या. त्यांच्या करण्याला प्रोत्साहन द्या.

**रचनावादी शिक्षण : सूत्र - ५**

- मुला -मुलींना इतरांबरोबर ,परस्परांच्या मदतीने , सहकाराने काम करीत शिकण्याची संधी मिळणे. कारण ,

• माणसाचा मेंदू हा मूलतः सामाजिक असतो.

• मेंदूच्या योग्य अशा वाढीसाठी इतरांची मदत हवी असते.

• एकत्र काम करून शिकल्याने शिक्षण परिपूर्ण होते.

• यात मुला-मुलींची मैत्रीची गरज भागते.

• त्यांच्यामध्ये सहकाराची भावना जोपासली जाते.म्हणून ,

• मुला - मुलींना वेगवेगळया परिस्थितीतील ,भिन्न स्वभावाच्या मित्र - मैत्रिणींसमवेत काम

करू द्या , शिकू द्या , खेळू द्या.

**रचनावादी शिक्षण म्हणजे काय ?**

रचनावादी शिक्षण हे मूलतः विद्यार्थीकेंद्री शिक्षण असते. आकलनशास्त्रामधील संशोधने , मेंदूविषयक संशोधने , मानसशास्त्रामधील व बुध्दिमत्तेविषयीची संशोधने , मुलांच्या शिक्षणाविषयी खूप नवी माहिती देतात. त्यांआधारे विद्यार्थीकेंद्री शिक्षणाची काही तत्त्वे सांगता येतात. ही तत्त्वे पुढीलप्रमाणे :

- स्वयंअध्ययनाचे तत्त्व
- स्वानुभवतत्त्व

स्वरचित अर्थपूर्णतेचे तत्त्व

आव्हानतत्त्व

परिपूर्तीतत्त्व

**विद्यार्थीकेंद्री शिक्षणाचे स्वयंअध्ययन तत्त्व**

प्रत्येक व्यक्तीला उपजतच आपले आपणच शिकण्याची क्षमता व प्रेरणा असते, त्यानुसार जन्मापासून प्रयत्न चालतो , असे संशोधनांतून सिध्द झाले आहे.

साहजिकच , मुलाची पाटी कोरी असते , त्यावर दुसरा कुणीतरी अक्षरे उमटवतो' हा पूर्वापार समज आज स्वीकारता येत नाही. आज शिक्षणात स्वयंअध्ययनाचे तत्त्व ग्राह्य मानले जाते.

**विद्यार्थीकेंद्री शिक्षणाचे स्वानुभवतत्त्व**

व्यक्ती आपले आपण शिकत असते , तेव्हा ती स्वतःच्या अनुभवांतूनच शिकत असते. अनुभव हाच आपला शिक्षक असतो. अनुभवांतूनच आपण आपल्या गरजांनुसार ज्ञानग्रहण करीत असतो. म्हणूनच सारे शिक्षण अनुभवांधारितच असावे लागते. साधे अनुभव, गुंतागुंतीचे अनुभव,खोलवरचे अनुभव , मूर्त-अमूर्त अनुभव , विविध संवेदनांचे अनुभव , व्यक्तींचे अनुभव , घटनांचे अनुभव अशा प्रकारच्या अनुभवांच्या अनेक संधी विद्यार्थ्यांना शिक्षणात मिळाव्या लागतात.

**विद्यार्थीकेंद्री शिक्षणाचे स्वरचित अर्थपूर्णतेचे तत्त्व**

मनुष्याला अनुभवांकरवी ज्ञानग्रहण होत असते. ते कसे होते ते या तत्त्वाने सांगितले आहे. मेंदूचा नेहमीच अर्थशोधनाचा कार्यक्रम चाललेला असतो. आजूबाजूच्या घटना, दृष्ये, आवाज-भाषा वगैरेंतून आपल्या पूर्वानुभवांशी ताळमेळ जुळणाऱ्या , म्हणजेच अर्थपूर्ण अशा गोष्टींचे आकलन मेंदू करून घेत असतो. विद्यार्थीसुध्दा आपल्या ज्ञानाची रचना अशीच अर्थपूर्ण गोष्टींच्याद्वारे करून घेत जातो. अशाप्रकारे प्राप्त केलेले ज्ञान म्हणजे स्वरचित ज्ञान होय. स्वरचित ज्ञान हे दीर्घकाळ टिकते.

विद्यार्थीकेंद्री शिक्षणाचे आव्हानतत्त्व नवनवे अनुभव घेणे, त्यांतील अर्थपूर्णतेचा शोध घेणे ही विद्यार्थ्याची शिकत जाण्याची प्रक्रिया असते.

एखादी गोष्ट नीट यायला लागली की, मग मुलांचा त्याविषयीचा रस कमी होतो. तीच तीच गोष्ट करण्याचा मुलांना कंटाळा येतो. एखादी गोष्ट साध्य झाली की, त्यापुढची पायरी घेण्याची मुलांना आंतरिक ओढ असते. पुढील पायऱ्या चढण्याचे आव्हान मुलांना हवे असते. त्यांतच ती रमतात व रमता रमता शिकतात.

प्रत्येक नव्या आव्हानाचा एक सुखद ताण असतो. नवे अनुभव घेणे , त्यांतून नव्याचा शोध घेणे ही नैसर्गिक घटना असते ; आव्हानाचा ताण त्याची सिध्दता करीत असतो. अशाप्रकारे, एका अर्थी, नैसर्गिक उद्दिष्टपूर्तीचा आनंदच यांतून मिळत असतो. यामुळे सारी शिक्षणप्रक्रियाच आनंदमय होत असते.

**विद्यार्थीकेंद्री शिक्षणाचे परिपूर्तीतत्त्व**

शिकण्याच्या प्रक्रियेतील आनंद दोन स्तरांवरचा असतो. एक, नवनवी आव्हाने घेत घेत पुढे जाण्याचा आव्हानानंद, आणि दोन, शिकताना विशिष्ट घटकाच्या आकलनाचा म्हणजेच,अर्थात्मकतेचा शोध लागण्याचा आनंद. हा दुसरा आनंद आहे परिपूर्तीचा आनंद. यालाच ज्ञानानंद असे म्हणता येईल. ( हाच तो ब्रह्मानंद सहोदर!)

शिकताना विद्यार्थ्याचा सारा प्रयत्न जर एखादी गोष्ट आकलन करून घेण्याचा असेल तर हे आकलन होण्यातच या प्रयत्नाची परिपूर्ती होत असते. शिक्षणाचे उद्दिष्ट या परिपूर्तीच्या थांब्यापर्यंत पोचण्याचे असते. या मार्गावर अर्धवट कुठेतरी पोचणे ही अर्थातच क्लेषकारक घटना असते.

❖